प्रेस नोट

वानवडी पोलीस ठाणे पुणे शहर
दिनांक - ०४/०७/२०१८

**वानवडी पोलीसांनी जबरी चोरी करणाऱ्या सराईत आरोपीतांना पकडुन त्यांचेकडुन जबरी चोरीच्या गुन्ह्याची उकल**

वानवडी पोलीस ठाणे पुणे शहर कडील अधिकारी व कर्मचारी यांनी आरोपी नामे (१) शहाबाज फिरोज खान, वय २८ वर्षे धंदा ड्रायव्हर रा.१०४१ नाना पेठ चुडामन तालीम पुणे, (२) इसामुद्दीन परवेज सय्यद वय २१ वर्षे धंदा गॅरेज रा.वसंतबहार सोसायटी फ्लॅट नंबर ३ जगताप चौक पुणे, (३) फरदीन परवेज खान, वय १९ वर्षे धंदा शिक्षण रा.सर्वे नंबर ४८, गल्ली नंबर १०, शामा मस्जिद जवळ, मिठानगर, कोंढवा पुणे यांना पकडुन त्यांचे मार्फतीने जबरी चोरीतील सोन्याचे दागीने घेणारा कारागीर नामे जोएल बंगाली ऊर्फ नाजमुलहसन मुजफ्फर सय्यद वय ३४ वर्षे धंदा कारागीर रा.२०११ जान महंमद स्ट्रीट बाबाजान दर्गा चौक कॅम्प पुणे मुळ गाव मु.लोदना,पो.ता.खंडघस, जि.बरधवमान, राज्य पश्चिम बंगाल यास ताब्यात घेवुन त्यांचेकडुन एकुण ११९.८०० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागीने व गुन्ह्यात वापरलेल्या दोन मोटार सायकली असा एकुण २,४०,०००/- रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

वानवडी पोलीस ठाणेकडील पो.हवा.निसार खान व पो.शि.नवनाथ खताळ, पो.शि.नासीर देशमुख यांना विश्वसनीय माहीती मिळाली की, रेकॉर्डवरील जबरी चोरीतील सराईत गुन्हेगार हे बाबाजान दर्गा चौक कॅम्प पुणे येथे येणार आहेत. त्याअनुषंगाने वानवडी पोलीस ठाणेकडील तपास पथकाचे पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी सापळा लावुन ते दिसताच पळुन जात असताना त्यांना लागलीच ताब्यात घेण्यात येवुन त्यांना वानवडी पोलीस ठाणे येथे आणुन, विश्वासात घेवुन अधिक तपास केला त्यांनी वानवडी पोलीस ठाणेकडील ०१ जबरी चोरीचा गुन्हा केल्याचे तपासात निष्पन्न होवुन त्यांचेकडुन एकुण २,४०,०००/- रुपये किमतीचा मुद्देमाल दाखल गुन्ह्याचे पुरावेकामी जप्त करण्यात आलेला आहे.

सदरची कारवाई मा.पोलीस उप-आयुक्त श्री दिपक साकोरे सो, परिमंडळ-४ पुणे शहर, मा.सहा.पोलीस आयुक्त श्री मिलिंद पाटील सो, वानवडी विभाग पुणे शहर, मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री सयाजी गवारे सो, वानवडी पोलीस ठाणे पुणे शहर, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक श्री अजय म्हेत्रे, सहा.पोलीस फौजदार रमेश भोसले, पो.ना.ज्ञानदेव गिरमकर, पो.ना.सुदर्शन बोरावके, पो.शि.योगेश गायकवाड, पो.शि.कानिफनाथ कारखेले, पो.शि.प्रतिक लाहीगुडे, पो.शि.शिरीष गोसावी, पो.शि.कैलास माळकर, पो.शि.अनुप सांगळे यांच्या पथकाने केली.